अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# निवडणुकीची वरात आणि सवलतींची खैरात

मंत्रालय स्वस्त घराच्या योजनेच्या अफवांनी दणाणले असतानाच दुसरीकडे राज्य मंत्रिमंडळाने निवडणुकीच्या वरातीपूर्वीच अनेक सवलतीच्या योजनांची खैरात केली आहे. आतापर्यंत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकांमध्ये एकाच वेळी दहा ते बारा निर्णय घेण्याचा उच्चांक कधीही नोंदला गेला नाही. परंतु निवडणुकीच्या घोडामैदानाचा अंदाज घेऊन निर्णयांचे कागदी घोडे असे काही पळवले जात आहेत की, गेल्या तीन बैठकांमध्ये तीस निर्णयांचा झेंडा फडकवून सरकारने विक्रम केला आहे. साधारणपणे असे मानले जाते की, ज्यावेळेला अशा प्रकारचे घाईगर्दीचे आणि सवलतीचे निर्णय घेतले जातात त्यावेळेला त्या पक्षाला आपल्या विजयाची खात्री उरलेली नसते. बुडत्याला काडीचा आधार या म्हणीप्रमाणे काही ना काही करून आपले अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष करतात. महाराष्ट्रातल्या लोकशाही आघाडी सरकारलाही पराभवाची घरघर लागलेली दिसते. अन्यथा गेली वर्ष-दीड वर्षे प्रलंबित असलेले हे निर्णय केवळ आठवडाभरात घेण्याची घाईगर्दी केली गेली नसती. केंद्रामध्ये युपीए सरकारही पराभवाच्या भीतीने पछाडले आहे आणि म्हणून जाता-जाता अधिकाधिक मते पदरात पाडून देणारे निर्णय घेण्याचा सपाटा मनमोहन सिंग सरकारने लावला आहे. परंतु त्याचा फारसा लाभ होत नाही. लोकांना त्याच्यामागचा राजकीय हेतू सहजपणे समजतो. यापूर्वी सुध्दा एनडीए सरकारने इंडिया शायनिंगच्या नावाखाली निर्णयांचा धडाका लावला आणि आपण कसे सरकार चालवण्यात बहाद्दर आहोत असे दाखवण्याचा प्रयत्न केला. अर्थातच त्यामध्ये कोणतेही राजकीय शहाणपण नव्हते. निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचा कटोरा रिकामा राहू नये यासाठी केलेला खटाटोप होता. शेवटी जे व्हायचे ते होऊन एनडीए सरकार जवळपास इतिहासजमा झाले. बहुतेक केंद्रात आणि राज्यातल्या दोन्ही काँग्रेस सरकारला येणाऱ्या निवडणुकीमध्ये स्वत:ला इतिहासजमा करून घेण्याची घाई झालेली दिसते. आश्चर्य एवढेच आहे की, जी कार्यक्षमता सरकार आता दाखवते आहे, ती त्यांना अगदी वर्षभरापूर्वीसुध्दा दाखवता आली असती. अगदी उच्च माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान सुरू करण्याच्या प्रश्नापासून ते गडचिरोलीमधल्या सहकारी तत्त्वावरच्या बांबू प्रक्रिया उद्योग सुरू करण्यापर्यंतच्या प्रकल्पांना यापूर्वीच मंजुरी देता आली असती.

### महिला धोरण आणि अंगणवाडी सेविकांवर अन्याय

एकीकडे सरकारची आर्थिक बाजू नाजूक असताना असे निर्णय घेण्याचे धाडस सरकारने दाखवावे हे एक आश्चर्य ठरते. कारण अनुदान देण्यापासून ते विविध सवलती जाहीर करण्यापर्यंत सरकारने आपल्या तिजोरीचा विचारच केला नाही की काय? असा प्रश्न निर्माण होतो. आता घेतलेल्या निर्णयांसाठी योग्य ती आर्थिक तरतूद वर्षभरापूर्वीच करता आली असती आणि राज्याच्या अनेक भागांमध्ये काम करणाऱ्या हजारो अंगणवाडी सेविकांना वर्षभरापूर्वीच योग्य तो न्याय देता आला असता. अजूनही तो न देण्याचे सरकारचे टाळाटाळीचे धोरण सुरू आहे. सेवानिवृत्त अंगणवाडी सेविकांना एक लाख रुपये देण्याची घोषणा ही निवडणुकीच्या तोंडावर केलेली मखलाशी आहे. कारण प्रत्यक्ष काम करणाऱ्या सेविकांच्या मागण्या धुडकावून लावायच्या आणि एक लाख रुपयाचे आमिष दाखवून त्यांच्या डोळ्यात धूळफेक करायची, असा हा सगळा स्वार्थी प्रकार आहे. त्यांच्या मानधनामध्ये सन्माननीय वाढ करणे अपेक्षित होते. त्याकडे मात्र सरकारने दुर्लक्ष केलेले दिसते. या निर्णयाला मखलाशी अशासाठी म्हणावे लागते की, एकीकडे राज्याचे तिसरे महिला आर्थिक धोरण जाहीर करायचे आणि दुसरीकडे अंगणवाडीच्या सेविकांवर अन्याय करायचा. महिला धोरणामध्ये आपण कसे महिलांच्या विकासाचे कैवारी आहोत असे दाखवण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु आपल्याच गावामध्ये शिक्षणासारख्या क्षेत्रात थोडेफार कार्य करून मर्यादित रोजगार मिळवणाऱ्या या अंगणवाडी सेविकांना योग्य ते मानधनही द्यायचे नाही. अशावेळी महिला धोरणाचा हा गाजावाजा किती बेगडी स्वरूपाचा आणि परस्पर विरोधी आहे हे दिसून येते. तसे पहायला गेले तर राज्याच्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या भरतीमध्ये अजूनही महिलांना योग्य तो वाटा मिळालेला नाही. जोपर्यंत असमान वागणूक देण्याचा हा सरकारी अत्याचार थांबत नाही, तोपर्यंत सरकारी धोरणाचा प्रचार फुसकाच म्हणावा लागेल. अर्थात हा सगळाच निवडणुकीच्या हंगामातील निर्णयांचा हंगाम असल्यामुळे या निर्णयांची अंमलबजावणी केली जाईल याची हमी देता येत नाही. अनेक महत्त्वाच्या निर्णयांबाबत अशाच पध्दतीचे राजकारण खेळले जात असल्यामुळे वर्षानुवर्षे समाजातल्या अनेक घटकांवर अन्याय होत राहिला. अंगणवाडी सेविका हे त्याचे ताजे उदाहरण ठरते. गेल्या पाच वर्षांपासून शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा विषय सरकारच्या अजेंड्यावर आहे. त्यासाठी बराच मोठा खर्च येणार असूनही आता केवळ शंभर कोटींची तरतूद करून निवडणुकीत प्रचाराचा मुद्दा निर्माण केला गेला आहे.

### उसना उमाळा

ज्या गतीने मंत्रिमंडळाच्या गेल्या तीन बैठकांमध्ये निर्णयांचा सपाटा लावला गेला. हाच वेग आणि हीच क्षमता मंत्रिमंडळाच्या प्रत्येक बैठकीत दाखवली गेली असती तर आज महाराष्ट्र कुठल्या-कुठे पोहचला असता. दिल्लीमध्ये अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीचे सरकार आल्यानंतर त्यांनी केवळ महिनाभरात आश्चर्यकारक वेगाने निर्णय घेतले. भलेही त्यांच्यामध्ये पहिल्यांदाच सत्तेवर आल्यामुळे उत्साह असू शकेल. परंतु राज्याचा कारभार व्यवस्थितपणे चालवायचा असेल तर अशाच गतीने याच वेगाने किंवा कार्यक्षमतेने निर्णय घेतले जाणे आवश्यक ठरते. महाराष्ट्रात रोजगार हमी योजना अत्यंत यशस्वी ठरली. तिच्या आधारावर केंद्र सरकारने नवीन योजना तयार केली. या रोजगार हमी योजना कायद्याच्या अंतर्गत बेरोजगारांना भत्ता दिला जातो. वर्षानुवर्षे तुटपुंजा भत्ता देऊन बेरोजगारांची चेष्टा केली जात होती. परंतु आता मतांसाठी आणि निवडणुकीच्या तोंडावर या भत्त्यामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला. खरेतर दरवर्षी महागाई निर्देशांकाच्या प्रमाणात बेरोजगाराच्या भत्त्यातही वाढ करण्याची आवश्यकता आहे. बेकारांना रोजगार तर द्यायचा नाही आणि त्यांच्या भत्त्याकडेही दुर्लक्ष करायचे, असा हा सगळा तथाकथित लोककल्याणाचा उसना उमाळा सरकारला आलेला आहे.